सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

दूरध्वनी : 0253-2231479, 2230580 फॅक्स :2231716

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

ज्ञानगंगा घरोघरी

परीक्षा व नोंदणी विभाग

जा.क्र. : पनिका/2017/ दिनांक : 26.08.2017.

# शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील (बी.एस्सी एम.एल.टी व ऑप्टो) प्रवेशार्थीसाठी महत्वाच्या सूचना

विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार शैक्षणिक सत्र 2017-18 साठी सर्व शिक्षणक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने सुरू आहे. बी.एस्सी. एम.एल.टी आणि बी.एस्सी. ऑप्टो शिक्षणक्रम विद्यापीठाने तांत्रिक बाबींमुळे नैसर्गिक वाढीने बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे उपरोक्त शिक्षणक्रमांसाठी प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील गोष्टींचे अवलोकन करावे अन्यथा आपला प्रवेश चुकीचा होऊ शकतो. **ऑनलाईन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे.**

1. बी.एस्सी. एम.एल.टी. आणि बी.एस्सी. ऑप्टो. शिक्षणक्रमाचे प्रथम आणि द्वितीय वर्षाचे प्रवेश नैसर्गिक वाढीने शिक्षणक्रम बंद होत असल्याने प्रवेश बंद करण्यात येत आहेत.
2. ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष उत्तीर्ण अथवा प्रवेशार्थी होते, शैक्षणिक सत्र 2015-16 आणि 2016-17 मध्ये द्वितीय वर्षाचा प्रवेश घेतला नाही त्यांच्या विनंतीवरून विद्यापीठाच्या पोर्टलवर प्रथम वर्षाच्या कायमनोंदणी क्रमांकावरील विद्यार्थ्यांसाठी द्वितीय वर्षाचे प्रवेश ऑनलाईन सुरू ठेवलेले आहेत. **ह्याव्यतिरिक्त प्रवेश केल्यास प्रवेश ऑनलाईनला चुकीचा होऊ शकतो.**
3. डी.एम.एल.टी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सरळ प्रवेश करण्याची सोय उपलब्ध नाही. डीएमएलटीच्या गुणपत्रकावर अथवा कायमनोंदणी क्रमांकावर प्रवेश केल्यास सदरचा प्रवेश रद्द होईल याची विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना काळजी घ्यावी.
4. चुकीचा प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द करण्यासाठी विद्यापीठाला पत्रव्यवहार करावा. चुकीचा प्रवेश करून स्वतः अडचणीत येऊ नका.
5. विद्यापीठाच्या पोर्टलवरील अॅडमिशन टॅबमधील माहितीपुस्तिका व विद्यार्थ्यांसाठची सूचना व नियम वाचूनच प्रवेश करावा. आपणाकडून सहकार्याची अपेक्षा.

**प्रा.(डॉ.)अर्जुन पी. घाटुळे**
***परीक्षा नियंत्रक***

प्रत माहितीसाठी –

1. मा.कुलगुरू,यचममु विद्यापीठ, नाशिक 2. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, यचममु विद्यापीठ, नाशिक, 3. संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा, यचममु विद्यापीठ, नाशिक,
2. मा. संचालक, विभागीय केंद्र, द्वारा - अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड. आपणांस विनंती की, आपल्या विभागातील संबंधित शिक्षणक्रमाच्या सर्व अभ्यासकेंद्रांना सदरचे प्रकटन तात्काळ ई-मेलने पाठवावे. तसेच चुकीचे प्रवेश स्विकारू नयेत अशी माहिती द्यावी. तसेच **अभ्यासकेंद्रांनी सदरचे डीएमएलटीनंतर द्वितीय वर्षाचे प्रवेश स्विकारू नयेत.**